**परिपत्रक**

**महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या वेतनातून कपात करावयाच्या रक्कमेबाबतची माहिती संचित पोर्टलमधील प्रपत्रात अद्ययावत करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
**नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत, ७ वा मजला,**
**बेलापूर भवन, (सी.बी.डी.), बेलापूर, नवी मुंबई -४००६१४**
**क्र.नपप्रसं/मु.अ.आस्था/संपो/परिपत्रक/२०२४/कक्ष-२/** 8716
**दिनांक : २४ डिसेंबर, २०२४.**
24 DEC 2024

**वाचा** :- १) संचालनालय परिपत्रक क्रम नपप्रसं/मु.अ.-आस्था/सेनि/सुचना/२०२०/कक्ष-२/२५३६, दि.१०.११.२०२०.
२) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे परिपत्रक क्र.नपप्रसं/मु.अ.आस्था/सेवाविषयक-बाबी-सूचना/२०२१/कक्ष-२/३२६४ दि.२४ सप्टेंबर, २०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने निवड झालेल्या तसेच पदोन्नतीने कार्यरत असलेल्या महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील राजपत्रित संवर्गातील अधिकाऱ्यांना शासन आदेशानूसार राज्यातील विविध महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती, विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपरिषद प्रशासन संचालनालय तसेच अन्य आस्थापनेवर कार्यरत असतात. वाचा क्र.१ व वाचा क्र.२ येथील परिपत्रकान्वये मुख्याधिकारी यांच्या निवृत्तीवेतन अंशदान व रजावेतन अंशदान विहित वेळेत भरणा करून चलनाच्या प्रती विभागांनी त्यांच्या अभिलेख्यांवर ठेवण्याचे निर्देशित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील राजपत्रित संवर्गातील अधिकारी विभागांतर्गत नगरपरिषदा, नगरपंचायती, महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय कार्यालयात व अन्य कार्यालयातील आस्थापनेवर कार्यरत असताना निवृत्तीवेतन अंशदान व रजावेतन अंशदान, निवृत्तीवेतन, उपदान, रजारोखीकरण, भविष्य निर्वाह निधी, राज्य गट विमा वर्गणी, DCPS/NPS वर्गणी इत्यादीं लाभ शासनाच्या लेख्याशिर्षामध्ये विहित मुदतीत जमा करणे बंधनकारक आहे. सदरचे लाभ विहीत मुदतीत प्रदानाबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियमांत सुस्पष्ट तरतुदी असून, त्यांचे पालन करणे हे सर्व कार्यालयांना बंधनकारक आहे.

संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील राजपत्रित संवर्गातील अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे निवृत्तीवेतन अंशदान व रजावेतन अंशदान, निवृत्तीवेतन, उपदान, रजारोखीकरण, भविष्य निर्वाह निधी, राज्य गट विमा वर्गणी, DCPS/NPS वर्गणी इत्यादीं कपातीच्या रकमा वेळेवर भरणा करण्यास संबंधित कार्यालयाकडून विलंब होत आहे. तसेच सेवानिवृत्ती वेतन मंजुरीचे प्रस्ताव महालेखाकार कार्यालयांकडे सादर करण्यास विलंब होतो. सेवानिवृत्ती झालेल्या अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरचे तद्अनुषंगिक लाभ मिळण्यास विलंब होत असल्यामुळे, काही सेवानिवृत्त अधिकारी मा.लोक आयुक्त/उप लोकआयुक्त तसेच मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT) यांचेकडे खटला/दावा दाखल करतात. त्यामुळे, काही प्रकरणांत मा.न्यायाधिकरणाकडून विलंबाने प्रदान झालेल्या सेवानिवृत्तीनंतरचे तद्अनुषंगिक लाभावर व्याज प्रदान करणेबाबत आदेश पारित केले जातात.

संचालनालय स्तरावरुन महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींबाबत पारदर्शकता व गतिमानता येण्याकरिता, संचित पोर्टलवर खालील नमूद प्रकरणी विहीत **प्रपत्र** तयार करण्यात आली आहेत. संचालनालयाने संबंधित सर्व कार्यालयांना संचित पोर्टलचे लॉगीन आयडी तयार करुन दिलेले आहेत.

**१) भविष्य निर्वाह निधी (GPF)**
**२) गट विमा योजना (GIS)**
**३) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (DCPS/NPS)**
**४) रजावेतन अंशदान (Leave Pay Contributions)**
**५) निवृत्तीवेतन अंशदान (Pension Contributions)**

महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील राजपत्रित संवर्गातील अधिकाऱ्यांच्या प्रकरणी संचालनालयाने तयार केलेल्या संचित पोर्टल प्रपत्रामध्ये दरमहा माहिती अद्ययावत करण्याची जबाबदारी नगरपरिषदा/नगरपंचायतीसाठी संबंधित मुख्याधिकारी व महानगरपालिकाबाबत मुख्य लेखा वित्तीय अधिकारी यांची राहील. त्याकरीता आवश्यकतेनूसार नगरपरिषदा / नगरपंचायती / महानगरपालिका स्तरावरुन एका अधिकाऱ्याची नेमणूक करावी. तसेच इतर कार्यालयाकरीता संबंधित

लेखा विभाग प्रमुख यांची राहील. सदरची माहिती संचित पोर्टलवर भरण्याबाबत खालीलप्रमाणे सुचना विचारात घेणे आवश्यक आहेत.

१) राज्यातील विविध महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती येथे कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या प्रकरणी संचित पोर्टल प्रपत्रात दरमहा माहिती अद्ययावत करुन, भरलेल्या चलनाची प्रत PDF स्वरुपात सादर करणे.

२) शासनाच्या आदेशानूसार ज्या कार्यालयामधून निलंबनाच्या कालावधीतील निर्वाह भत्ता व पूरक भत्ते सेवार्थ प्रणालीमधून अदा केली जात नाहीत. त्या संबंधित कार्यालयाने संचित पोर्टल प्रपत्रामध्ये दरमहा माहिती अद्ययावत करुन, भरलेल्या चलनाची प्रत PDF स्वरुपात सादर करणे.

३) शासनाच्या आदेशानूसार मंत्रालयीन विभागामध्ये व अन्य कार्यालयाच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने / पदोन्नतीने व इतर कारणामुळे कार्यरत अधिकाऱ्यांच्या प्रकरणी, तसेच प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील केंद्र व राज्य शासनाच्या अंतर्गत सुरु असलेल्या विविध योजना व अभियांनातर्गत अन्य कार्यालयाची नवनिर्मिती होवून पदनिर्मिती झालेल्या अधिकाऱ्यांचे वेतन सेवार्थ प्रणालीमधून अदा केली जात नाहीत. त्या अधिकाऱ्यांच्या प्रकरणी संबंधित कार्यालयाच्या नजीकच्या विभागाने संचित पोर्टल प्रपत्रात दरमहा माहिती अद्ययावत करुन, भरलेल्या चलनाची प्रत PDF स्वरुपात सादर करणे.

४) शासनाच्या आदेशानूसार ज्या अधिकाऱ्यांना नियुक्तीच्या प्रतिक्षेत ठेवण्यात आले आहे, अशा अधिकाऱ्यांना शासनाने नियुक्ती/पदस्थापना दिल्यानंतर ज्या संबंधित कार्यालयाकडून वेतन व भत्ते फरक अदा केले जाईल, त्या संबंधित कार्यालयाने मासिक वेतनातून कपात केलेल्या रकमेबाबत संचित पोर्टल प्रपत्रामध्ये दरमहा माहिती अद्ययावत करुन, भरलेल्या चलनाची प्रत PDF स्वरुपात सादर करणे. तसेच नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेल्या अधिकाऱ्यांच्या प्रकरणी शासनाने सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करुन आदेश निर्गमित केले असल्यास संबंधित कार्यालयाकडून एकत्रितरित्या वेतन व भत्ते फरक अदा केले जाईल, त्यावेळी दरमहा मासिक वेतनातून कपात होणाऱ्या रक्कमेबाबत त्या-त्या दरमहा मासिक वेतनातून कपात करावयाच्या रकमेबाबत संचित पोर्टल प्रपत्रात दरमहा माहिती अद्ययावत करुन, भरलेल्या चलनाची प्रत PDF स्वरुपात सादर करणे.

५) मासिक वेतन देयके मंजूर करताना, मागील महिन्याचे वेतन देयकातून कपात केलेल्या उपरोक्त बाबींची संचित पोर्टलवर नोंद घेतली असल्याबाबत खातरजमा करुन घ्यावी.

६) संबंधित सर्व कार्यालयांनी महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचे **दि.०१ जानेवारी, २०२५** पासून नियमितपणे सेवाविषयक संचित पोर्टलवरील प्रपत्र अद्यावत करण्याबाबत कार्यवाही करावी.

सबब उपरोक्त बाबींची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल याची संबंधित सर्व कार्यालयांनी दक्षता घ्यावी.

**मा.आयुक्त तथा संचालक यांच्या मान्यतेने**

**( संजय काकडे )**
**सह आयुक्त**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई**

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) मा.प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).
३) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).
४) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).
५) सह आयुक्त, कार्यासन-८ (ई-गव्हर्नन्स), नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई.
/- संचित पोर्टलवरील महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचे सेवाविषयक नमुन्यांबाबतचे प्रशिक्षण आयोजित करणे.
६) निवड नस्ती.

**प्रति :-**

१) विभागीय सह आयुक्त / उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय (सर्व).
२) जिल्हा सह आयुक्त / सहायक आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व).
३) महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व).

## गट विमा योजना (GIS)

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | कार्यरत कार्यालय नाव (महानगपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत व इतर') | कार्यरत अधिकाऱ्यांचे नाव | संवर्ग श्रेणी (गट अ-ब) | कार्यरत कार्यालय पदनाम | कार्यरत कार्यालय रुजू दिनांक | प्रथम नियुक्ती दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | सेवार्थ क्रमांक | कार्यरत कार्यालय कालावधी (पासून आणि पर्यंत) | वेतन शासकीय कोषागार कार्यालयातून अदा करण्यात येते किंवा कसे? (होय / नाही ) | शासन नियमानुसार कपात करावयाची गट विमा योजना (GIS) रक्कम रूपये | वेतनातून गट विमा योजना (GIS) कपात केलेली रक्कम रूपये | गट विमा योजना (GIS) कपात केलेला महिना व वर्ष चलनाची PDF सोबत जोडावी. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |

## रजावेतन अंशदान (Leave Pay Contribution)

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | कार्यरत कार्यालय नाव (महानगपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत व इतर') | कार्यरत अधिकाऱ्यांचे नाव | संवर्ग श्रेणी (गट अ-ब) | कार्यरत कार्यालय पदनाम | कार्यरत कार्यालय रुजू दिनांक | प्रथम नियुक्ती दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | सेवार्थ क्रमांक | कार्यरत कार्यालय कालावधी (पासून आणि पर्यंत) | वेतन शासकीय कोषागार कार्यालयातून अदा करण्यात येते किंवा कसे? (होय / नाही ) | शासन नियमानुसार कपात करावयाचे रजावेतन (Leave Pay) रक्कम रूपये | कार्यालयाने कपात केलेले रजावेतन (Leave Pay) रक्कम रूपये | रजावेतन (Leave Pay) कपात केलेला महिना व वर्ष चलनाची PDF सोबत जोडावी. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |

## निवृत्तीवेतन अंशदान (Pension Contributions)

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | कार्यरत कार्यालय नाव (महानगपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत व इतर') | कार्यरत अधिकाऱ्यांचे नाव | संवर्ग श्रेणी (गट अ-ब) | कार्यरत कार्यालय पदनाम | कार्यरत कार्यालय रुजू दिनांक | प्रथम नियुक्ती दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | सेवार्थ क्रमांक | कार्यरत कार्यालय कालावधी (पासून आणि पर्यंत) | वेतन शासकीय कोषागार कार्यालयातून अदा करण्यात येते किंवा कसे? (होय / नाही ) | शासन नियमानुसार कपात करावयाची निवृत्तीवेतन अंशदान (Pension Contributions) रक्कम रूपये | कार्यालयाने कपात केलेले निवृत्तीवेतन अंशदान (Pension Contributions) रक्कम रूपये | निवृत्तीवेतन अंशदान (Pension Contributions) कपात केलेला महिना व वर्ष चलनाची PDF सोबत जोडावी. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |

## भविष्य निर्वाह निधी (GPF)

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | कार्यरत कार्यालय नाव (महानगपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत व इतर') | कार्यरत अधिकाऱ्यांचे नाव | संवर्ग श्रेणी (गट अ-ब) | कार्यरत कार्यालय पदनाम | कार्यरत कार्यालय रुजू दिनांक | प्रथम नियुक्ती दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | सेवार्थ क्रमांक | कार्यरत कार्यालय कालावधी (पासून आणि पर्यंत) | वेतन शासकीय कोषागार कार्यालयातून अदा करण्यात येते किंवा कसे? (होय / नाही ) | भविष्य निर्वाह निधी (GPF) क्रमांक | शासन नियमानुसार कपात करावयाची भविष्य निर्वाह निधी (GPF) रक्कम रूपये | वेतनातून भविष्य निर्वाह निधी (GPF) कपात केलेली रक्कम रूपये | भविष्य निर्वाह निधी (GPF) कपात केलेला महिना व वर्ष चलनाची PDF सोबत जोडावी. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |

## परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (DCPS-NPS)

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | कार्यरत कार्यालय नाव (महानगपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत व इतर') | कार्यरत अधिकाऱ्यांचे नाव | संवर्ग श्रेणी (गट अ-ब) | कार्यरत कार्यालय पदनाम | कार्यरत कार्यालय रुजू दिनांक | प्रथम नियुक्ती दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | सेवार्थ क्रमांक | कार्यरत कार्यालय कालावधी (पासून आणि पर्यंत) | वेतन शासकीय कोषागार कार्यालयातून अदा करण्यात येते किंवा कसे? (होय / नाही ) | राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना PRAN क्रमांक | शासन नियमानुसार कपात करावयाची DCPS-NPS रक्कम रूपये | वेतनातून DCPS-NPS कपात केलेली रक्कम रूपये | DCPS-NPS कपात केलेला महिना व वर्ष चलनाची PDF सोबत जोडावी. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |